25 वर्षे
विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे - 401 101 दुरध्वनी क्रं. 28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

**जा.क्र.मिभा/मनपा/पा.पु.व मलनि/ ५४२ /२०२६-२७** **दि. ११ /०६/२०२६**

**विषय :- सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा आढावा.**

## // प्रेस नोट //

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबवित असलेल्या 403 द.ल.ली. क्षमतेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून मिरा भाईंदर महानगरपालिका 218 द.ल.ली. पाणी चेने येथील जलकुंभामध्ये प्राप्त होणार आहे. तेथून पुढे सदरचे 218 द.ल.ली. पाणी शहरामध्ये समप्रमाणात वितरीत करण्यासाठीची वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था व जलकुंभाची कामे महानगरपालिकेमार्फत केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत प्रगतीपथावर आहेत.

वरील कामे पुर्ण होण्यासाठी काही तांत्रिक कारणास्तव दिरंगाई झालेली आहे. सदर तांत्रिक कारणांचा आढावा घेऊन महानगरपालिकास्तरावर योग्यती कार्यवाही करण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी संबंधीत सर्व यंत्रणा (MMRDA, MSETCL, संबंधीत कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) यांची संयुक्तीक बैठक आयोजीत करुन रखडलेली कामे पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून मार्गक्रमन करण्यात येते.

याअनुषंगाने दि.10/06/2026 रोजी आढावा बैठक आयोजीत केलेली होती. सदर बैठकीमध्ये सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून उपलब्ध होणारे पाणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेने जलाशयापर्यंत किमान ऑगस्ट 2026 अखेर पर्यंत उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सदरचे पाणी शहरात सद्यस्थितीत आवश्यक असणारे म्हणजेच सद्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कमी पडणारे सुमारे 60 ते 70 द.ल.ली. पाणी शहरात वितरीत करण्यासाठी आवश्यक असणारे 10 जलकुंभ सदरच्या जलकुंभासाठीच्या आवश्यक जलवाहिन्या व अनुषंगीक कामे ही ऑगस्ट 2026 अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे निर्देश या कामाचे कंत्राटदार मे. इगल इन्फ्रा इंडीया लि. या कंपनीस देण्यात आलेले आहेत. तसेच कंत्राटदाराने काम पुर्ण करण्यास हलगर्जी केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची गंभीर दखल घेण्यात येईल. असा इशारा देण्यात आलेला आहे.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका